| | |
|---|---|
| **MHST090004032019** | **नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ६३/२०१९**<br>अजिज महमंद मुलाणी, वगैरे.<br>वि.<br>रहिमुददीन महमंद मुलाणी, वगैरे. |

<u>नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ६३/२०१९ मधील निशाणी २३ खालील आदेश</u>

प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ क्रम १७ नुसार कैफियत दुरुस्ती करिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीच्या प्रस्तुत अर्जातील कथनांनप्रमाणे, प्रस्तुत प्रतिवादीने कैफियतीमधील सरनाम्यातील वादीचे नावापुढे टंकलेखनातील दोषामुळे "उर्फ" असा शब्द नमूद झालेला आहे सदर "उर्फ" या शब्दास काट देणेत यावी. तसेच प्रतिवादी यांची कैफियत कलम ५ मध्ये ओळ क्र. ६ मध्ये "आहे" या शब्दानंतर सदर ता. २४.०५.१९८२ च्या खरेदीपत्राची नोंद गट नं १२८ चे सातबारा सदरी फे. क्र. २७७ ने झालेली आहे, असा नव्याने मजकुर समाविष्ठ करणेस परवानगी मागितली. प्रतिवादीच्या कथनानुसार सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असून सदर दुरुस्तीमुळे वादी व प्रतिवादी यांचेतील वाद संपुष्टात येणेस मदत होणार आहे. सबब अर्जात कथन केल्याप्रमाणे कैफियत दुरुस्ती करणेस परवानगी मागितली.

३. वादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केलेले आहे. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादीचा सदरचा अर्ज हा विलंबाने दिलेला आहे. अर्जास योग्य कारण दिलेले नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी यांनी वादीच्या दाव्यास निशाणी २१ ला कैफियत दाखल केली असल्याचे दिसून येत आहे. प्रतिवादी यांनी अर्जात केलेल्या मागणीचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की वादीच्या नावापुढे कैफियतीमध्ये उर्फ हा शब्द टंकलेखनातील दोषामुळे नमूद झालेला आहे. त्यामुळे प्रतिवादी मागणी करीत असल्याप्रमाणे उर्फ या शब्दास काट दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच कैफियतीच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे सदरची दुरुस्ती करणेस परवानगी देणे न्यायोचित दिसून येत आहे.

५. प्रतिवादीने तद्नंतर कैफियत कलम ५ मध्ये नव्याने मजकूर समाविष्ठ करणेबाबत परवानगी मागितलेली आहे. सदर प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप पाहता सदरची प्रस्तावित दुरुस्ती ही कैफियतीमधील कथनांना नव्याने जादा माहिती पुरविणारी असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे

सदरची प्रस्तावित दुरुस्ती करणेस परवानगी दिल्यास कैफियतीच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. तसेच सदर दुरुस्ती मुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादी प्रस्तुत अर्जामध्ये मागत असलेली दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची दिसून येत आहे. तसेच प्रस्तावित दुरुस्तीमुळे वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद विषय योग्य रित्या निर्गमित होण्यास मदत होणार आहे. सबब अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे कैफियतीमध्ये दुरुस्ती करणेस प्रतिवादीला परवानगी देणे न्यायोचित दिसून येत आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादीचा प्रस्तुतचा अर्ज (निशाणी २३) र.रु. १००/– वादीला देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने अर्जात नमुद केल्याप्रमाणे कैफियतीमध्ये दुरुस्ती ७ दिवसाच्या आत करावी.

३. प्रतिवादीने दुरुस्त कैफियतीची प्रत व त्याच्या आवश्यक प्रती तद्नंतर तात्काळ सादर कराव्यात.

**दिनांक – २५.११.२०२१**
**ठिकाण – कोरेगांव**

**(समीर गोपाळ गुणारी)**
**दुसरे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर**
**कोरेगांव**

CERTIFICATE.

I affirms that the contents of this P.D.F file Judgment are same word for word as per original order.

| | |
|---|---|
| Name of Steno | : R. P. Sargar |
| Court Name | : Shri. S. G. Gunari, 2nd Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Koregaon,Satara |
| Date of order | : 25.11.2021 |
| Order signed by P.O. on | : 25.11.2021 |
| Order uploaded on | : 25.11.2021 |